शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील व्दितीय पाळीतील पदविका अभ्यासक्रम बंद करण्यास शासन मान्यता देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. मान्यता २०१७/(प्र.क्र. २१७ /१७)/तांशि-५,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०१७

<u>संदर्भ:</u>-१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे शुध्दीपत्रक क्रमांक : F. No. Western/ १-३३४४५२२६२६/२०१५/EOA/Corrigendum-२, दि.२/०५/२०१७.

२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र .१०/एनजीपी/मान्यता/२०१७१-८/३७९७, दिनांक ३ ऑगस्ट, २०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील व्दितीय पाळीतील पदविका अभ्यासक्रम बंद करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन त्याबाबतचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयाने शासनास सादर केला आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार सोबतच्या " परिशिष्ट-C" मधील दर्शविण्यात आलेल्या अभियांत्रीकी संस्थेतील पदविका अभ्यासक्रम बंद करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) या संस्थेतील बंद करावयाच्या अभ्यासक्रमांच्या संबंधित सर्व दस्तऐवज जसे की गुणपत्रिका, उत्तरपत्रिका, निकालपत्रे, विद्यार्थ्यांचे पत्ते, फीच्या पावत्या इत्यादी बाबी संस्थेने मंडळाकडे सूपूर्द करणे आवश्यक राहील.

२) संबंधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षक वर्ग/कर्मचारी यांच्या सेवाविषयक व इतर बाबतीत न्यायप्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणांची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील. भविष्यकाळात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

३) संस्थेकडून शासनाची वसुली अद्यापी थकबाकी असल्यास त्याचा भरणा करणे संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

४) संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेविषयी या संस्थेने शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले असल्याचे यापुढे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

५) संस्थेतील संबंधित अभ्यासक्रम बंद केल्यानंतर त्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना व माजी विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची इच्छा असल्यास त्याची पर्यायी व्यवस्था करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

६) संबंधित अभ्यासक्रमांसाठी नियुक्त केलेल्या संस्थेतील शिक्षक व कर्मचारी यांना देय असलेले वेतन, वेतन भरपाई व अन्य आर्थिक प्रदानाचे भुगतान करणे संस्थेस बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून संकेतांक क्रमांक २०१७१००४१५३९०७१५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2017.10.04 15:31:14 +05'30'

(अ. र. काटकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे (पू), मुंबई-५१,
३) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
४) संबंधित संस्था (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
५) निवड व नस्ती

प्रत माहीतीसाठी,

१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, AICTE ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ,नवी दिल्ली-११०००१
२) सहय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक),भारत सरकार ,मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय.

ANNEXURE-C

List of Diploma Institutes Approved for Closure of Second Shift Courses by AICTE for A.Y.2017-18

शासन निर्णय क्र. मान्यता २०१७ (प्र.क्र.२१७/१७)/तांशि-५ दिनांक. ०४/१०/२०१७

Sr. No.	Application ID	Permanent ID	Institute DTE Code	Name of the INSTITUTE	INSTITUTE Address	INSTITUTE District	Institute Type	Name of the Society/ Trust	Programme	Shift	Lavel of Course	Course Status A.Y 2015-16	Full time/Part time	Affiliating Body	Approved Intake 2015-16	Approved Intake 2016-17
1	1-3344522626	1-4190011	6277	DR. J.J.MAGDUM COLLEGE OF ENGINEERIN G	Gat No. 314/330, Agar Bhag, Shirolwadi Road, Jaysingpur, Kolhapur - 416101	KOLHAPUR	PRIVATE UN- AIDED	DR. J.J.MAGDUM TRUST	ENGINEERING AND TECHNOLOGY	2nd SHIFT	DIPLOMA	CIVIL ENGINEERING	FULL TIME	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	60	0
2	1-3344522626	1-4190011	6277	DR. J.J.MAGDUM COLLEGE OF ENGINEERIN G	Gat No. 314/330, Agar Bhag, Shirolwadi Road, Jaysingpur, Kolhapur - 416101	KOLHAPUR	PRIVATE UN- AIDED	DR. J.J.MAGDUM TRUST	ENGINEERING AND TECHNOLOGY	2nd SHIFT	DIPLOMA	MECHANICAL ENGINEERING	FULL TIME	Mharashtra State Board of Technical Education, Mumbai	60	0